## रेमेडेसिविरचा पुरवठा 'गिलियड' वाढवणार

**कॅलिफोर्निया :** गिलियड सायन्सेस ही कंपनी भारताला रेमडेसिविरचा पुरवठा वाढवणार असून 'व्हेकलुरी' म्हणजेच रेमडेसिविरच्या ४.५ लाख कुप्या मोफत देणगी म्हणून देणार आहे. गिलियड सायन्सेसच्या निवेदनात म्हटले आहे की, भारतात या औषधाची निर्मिती करणाऱ्या भागीदारांना तांत्रिक साह्य पुरवले जाईल. नवीन स्थानिक उत्पादन प्रकल्प सुरू केले जातील तसेच उत्पादनही वाढवले जाईल. भारतीय रुग्णांची निकड भागावी यासाठी कुप्या देण्यात येणार आहेत.

# संकटसमयी मूकदर्शक बनू शकत नाही!

## सर्वोच्च न्यायालयाची भूमिका; 'न्यायालयीन हस्तक्षेपाकडे योग्य दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे'

**पीटीआय, नवी दिल्ली**

**देशात करोनाची** दुसरी मोठी लाट आली आहे. ती राष्ट्रीय आपत्ती असल्याने त्याकडे मूक प्रेक्षक म्हणून पाहता येणे शक्य नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी स्पष्ट केले. कोविड-१९ व्यवस्थापनाबाबत राष्ट्रीय धोरणाची मांडणी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून प्रक्रिया सुरू केली त्याकडे उच्च न्यायालयांमध्ये सुरू असलेल्या सुनावणींवरील अतिक्रमण या दृष्टिकोनातून पाहू नये, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

आपल्या राज्यांमधील साथरोगाबाबतच्या स्थितीवर उच्च न्यायालयांना अधिक योग्य पद्धतीने लक्ष ठेवता येते आणि सर्वोच्च न्यायालय त्यासाठी पूरक भूमिका घेत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या हस्तक्षेपाकडे योग्य दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. कारण काही बाबी या प्रादेशिक सीमेपलीकडील असतात, असे न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पीठाने म्हटले आहे. काही राष्ट्रीय प्रश्नांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करणे गरजेचे असते. कारण काही प्रश्न राज्यांमधील समन्वयाशी संबंधित असतात, त्यामुळे आम्ही पूरक भूमिका घेत आहोत. सीमांच्या मर्यादेमुळे हे प्रश्न हाताळताना जर उच्च न्यायालयांसमोर समस्या निर्माण झाली तर आम्ही मदत करू, असेही पीठाने स्पष्ट केले. उच्च न्यायालयांना याबाबत सुनावणी घेण्याची परवानगी असावी असे नमूद करून काही वकिलांनी, सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली, त्यावर टीका केली होती त्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने नोंदविलेल्या या निरीक्षणांना महत्त्व प्राप्त झाले आहे.

# स्वार्थासाठीच विकसित देशांकडून 'लस राष्ट्रवाद' म्यान

## 'ॲस्ट्राझेनेका'च्या लशीला अमेरिकेतच परवाना नाही

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

**गेले काही** महिने विकसित देशांनी करोना प्रतिबंधक लशी व कच्च्या मालाची साठेबाजी केली. पण आता भारतात करोनाची दुसरी लाट व विषाणूत नवी उत्परिवर्तने आली असताना आपल्यालाही यातून धोका निर्माण होऊ शकतो, हे लक्षात आल्याने त्यांनी आता करोना लशी व लशीचा कच्चा माल पुरवण्याची तयारी सुरू केली आहे. अमेरिकेने आधी 'अमेरिका फर्स्ट' अशी भूमिका घेतली होती पण आता त्या देशानेही लस पुरवण्याचे आश्वसन दिले आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी पंतप्रधान मोदी यांच्याशी ४५ मिनिटे संभाषण केल्यानंतर लशी व कच्चा माल तसेच इतर औषधे उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शवली. युरोपीय देशांनीही दक्षिण आफ्रिकेत नवीन रुग्ण सापडत असल्याने लशीच्या बाबतीत खुली भूमिका घेतली आहे. ॲस्ट्राझेनेकाची लस पुरवण्याची घोषणा त्यांनी केली आहे. ॲस्ट्राझेनेकाच्या लशीला अमेरिकेत परवाना अजून मिळालेला नाही, ती लस त्यांनी देण्याची तयारी दर्शवली आहे. अमेरिकेने आता औषध कंपन्यांची बैठक घेऊन कोविड लशींसाठी बौद्धिक संपदा हक्क माफ करण्याची तयारीही केली आहे. दक्षिण आफ्रिका व भारत यांनी आधी ही मागणी केली होती, तेव्हा अमेरिकेचा त्याला विरोध होता. पण नवीन अवताराचे विषाणू आपल्याकडेही येऊ शकतात, या भीतीतून त्यांनी आता मोकळेपणाची भूमिका स्वहितातून घेतली आहे.

लस राष्ट्रवाद अनेक श्रीमंत देशांनी उराशी बाळगला होता पण तो अंगाशी येण्याची लक्षणे दिसताच त्यांनी तो गुंडाळला आहे. पण त्यांनी आधीच भारतासारख्या देशांना लस पुरवठा नाकारून चूक करून ठेवली आहे. आता त्याचे धोके त्यांना कळून चुकले आहेत. १.३ अब्ज लोकसंख्येच्या भारत देशात दुसरी लाट ही जास्त हानिकारक विषाणूमुळे पसरली, असे काही वैज्ञानिकांचे मत असून त्यामुळे विषाणूंना नवे अवतार धारण करण्यास अनुकूल परिस्थिती मिळाली. सध्या ब्रिटनपासून इस्रायलपर्यंत ज्या लशी दिल्या जात आहेत, त्यांना दाद न देणारा विषाणू भारतात तयार झाला, तो दुहेरी उत्परिवर्तनाचा आहे.

नवी दिल्ली व वॉशिंग्टन येथील सेंटर फॉर डिसीज डायनॅमिक्स, इकॉनॉमिक्स अँड पॉलिसी या संस्थेचे संस्थापक रमणन लक्ष्मीनारायणन यांनी सांगितले की, भारतासारख्या देशात विषाणूचे नवे प्रकार येण्याची शक्यता आहे. त्यामुळे इतर देशांना नंतर धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे भारताला करोनातून बाहेर काढणे ही आता इतर देशांची गरज आहे. भारतात बी. १.६१७ या विषाणूच्या प्रकाराने थैमान घातले. त्यात दोन घातक उत्परिवर्तने आहेत. विशेष म्हणजे जगात हा विषाणू जास्त संसर्गजन्य आहे. सीएसआयआरच्या जिनॉमिक इन्स्टिट्यूटचे संचालक अनुराग अगरवाल यांच्या मते नवी दोन उत्परिवर्तनांचा विषाणू हा प्रतिकारशक्तीला चकवा देणारा आहे. हैदराबाद येथील सेंटर फॉर मॉलिक्युलर बायॉलॉजी या संस्थेचे संचालक राकेश मिश्रा यांनी सांगितले की, दुहेरी उत्परिवर्तनचा विषाणू जास्त संसर्गजन्य आहे. पण त्यामुळे जास्त मृत्यू घडून येण्याची शक्यता कमी आहे.

### भारताच्या मदतीसाठी अमेरिका तत्पर

#### जो बायडेन यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आश्वासन

**वृत्तसंस्था, वॉशिंग्टन**

**आम्हाला गरज** असताना भारताने मदत केली आहे त्यामुळे आता करोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे संकटात असताना आम्ही भारताला सर्वतोपरी मदत करू, असे आश्वासन अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या दूरध्वनी संभाषणानंतर दिले.

भारताला आपत्कालीन मदतीशिवाय साधनसामुग्रीही पुरवण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी व अध्यक्ष बायडेन यांच्यात सोमवारी दूरध्वनी संभाषण झाले होते. करोनाच्या दुसऱ्या साथीत भारत अडचणीत असताना अमेरिका संथ प्रतिसाद देत असल्याची टीका बायडेन प्रशासनावर झाली होती त्यानंतर अमेरिकेने भारताला मदत करण्याची तयारी दर्शवली असून लशीसाठी लागणारे घटक किंवा कच्चा माल पुरवण्याचेही मान्य केले आहे. अमेरिकेची गरज भागल्यानंतरच भारताचा विचार करण्यात येईल अशी भूमिका बायडेन प्रशासनाने या आधी घेतली होती.

### 'ॲस्ट्राझेनेका लशीच्या ६ कोटी कुप्या अमेरिकेकडून जगासाठी उपलब्ध'

सध्या जगात अनेक देशांत करोनाची साथ वाढत असताना त्यावर ॲस्ट्राझेनेका व ऑक्सफर्ड यांनी तयार केलेल्या लशीच्या ६ कोटी कुप्या अमेरिका जगाला उपलब्ध करून देईल, असे अमेरिकेचे महाशल्यचिकित्सक डॉ. विवेक मूर्ती यांनी म्हटले आहे. ॲस्ट्राझेनेकाची लस ही जगात मोठ्या प्रमाणात वापरण्यात येत असली तरी तिला अजून अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाने मान्यता दिलेली नाही.

# थायलंड, फ्रान्सकडून प्राणवायूची आयात

## दिल्ली सरकारचा निर्णय

**पीटीआय, नवी दिल्ली**

**वैद्यकीय** प्राणवायूच्या टंचाईमुळे दिल्लीत निर्माण झालेली आणीबाणीची स्थिती लक्षात घेऊन थायलंड आणि फ्रान्सकडून प्राणवायू आयात करण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी जाहीर केले आहे.

थायलंडकडून १८ क्रायोजेनिक टँकर आणि फ्रान्सकडून २१ वापरण्यास तयार असलेले प्राणवायू प्रकल्प आयात केले जाणार असल्याची माहिती केजरीवाल यांनी दिली. तसेच बँकॉकवरून हे टँकर आणण्यासाठी केंद्र सरकारने भारतीय हवाई दलाची विमाने द्यावीत, अशी विनंतीही त्यांनी केली आहे. हे टँकर बुधवारपासून दिल्लीत येण्यास सुरुवात होईल. आम्ही त्यासंदर्भात केंद्र सरकारशी चर्चा केली असून त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे, असेही त्यांनी सांगितले.

ऑक्सिजन टँकरच्या टंचाईमुळे केंद्र सरकारने जाहीर केलेली प्राणवायूची मदत दिल्ली सरकारला मिळण्यास अडचणी येत आहेत, असे दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले. त्यामुळे महिनाभरातच दिल्ली सरकार ४४ प्राणवायू निर्मिती प्रकल्प विविध रुग्णालयांत सुरू करणार आहे, अशी माहिती केजरीवाल यांनी दिली.

### फ्रान्सकडून प्राणवायू निर्मिती यंत्रांची मदत

द्रव प्राणवायू निर्मिती यंत्रे, द्रव प्राणवायू कंटेनर, श्वसन यंत्रे व इतर वैद्यकीय साहित्य फ्रान्स भारताला मदतीपोटी देणार आहे. फ्रान्सच्या युरोप व परराष्ट्र कामकाज मंत्रालयाने म्हटले आहे की, कठीण व आव्हानात्मक काळात भारत व फ्रान्स यांनी एकमेकांना नेहमीच मदत केली आहे. त्यामुळे करोनाच्या दुसऱ्या लाटेत कठीण आव्हाने झेलणाऱ्या भारताच्या पाठीशी आम्ही आहोत. भारत व फ्रान्स यांची चांगली मैत्री असून लोकपातळीवरही चांगला संपर्क आहे. फ्रान्सचे अध्यक्ष मॅक्रान यांनी भारताला मदतीचे आवाहन केल्यानंतर तेथील परराष्ट्र मंत्रालयाने भारताशी एकनिष्ठता दाखवून तातडीची वैद्यकीय मदत पुरवण्यासाठी तयारी केली आहे.



# 'ऑक्सिजन एक्स्प्रेस' मध्य प्रदेशला रवाना

**वृत्तसंस्था, भोपाळ**

**झारखंडमधील** बोकारो येथून प्राणवायूचे सहा टँकर रेल्वेने मध्य प्रदेशकडे मंगळवारी रवाना झाले आहेत, अशी माहिती रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली. कोविड १९ साथीच्या काळात देशातील रुग्णालयात प्राणवायूची कमतरता असून त्याला मध्य प्रदेशही अपवाद नाही.

वैद्यकीय वापराचा प्राणवायू सगळीकडेच कमी पडत आहे. अधिकाऱ्यांनी म्हटले आहे की, सहा प्राणवायू टँकर घेऊन ऑक्सिजन एक्स्प्रेस बोकारो येथून पहाटे साडेपाच वाजता रवाना झाली आहे. ती आज जबलपूरला व नंतर बुधवारी भोपाळला पोहोचणार आहे. मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी अशी माहिती दिली, की ही गाडी मंगळवारीच राज्यात येणार आहे. सहा टँकरपैकी दोन जबलपूर येथे तर भोपाळजवळ मंदीदीप स्टेशन येथे उतरवले जातील. ही गाडी भोपाळला कोटशिला, झारसुगुडा, बिलासपूर, न्यू कटनी व जबलपूर मार्गे येणार आहे. जबलपूर व मंदीदीप येथे टँकर उतरवण्यासाठी तयारी करण्यात आली आहे. भोपाळचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक उदय बोरवणकर हे गाडीच्या मार्गावर लक्ष ठेवून आहेत. मध्य प्रदेशात एकूण १२,६८६ रुग्ण सोमवारी सापडले असून एकूण रुग्णांची संख्या ५ लाख ११ हजार ९९० झाली आहे.

## पश्चिम बंगालमध्ये चढ्या दराने प्राणवायूची विक्री

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये करोना रुग्णांची संख्या वाढत असून अनेक ठिकाणी प्राणवायूच्या सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाला आहे. मात्र काही विक्रेते अवाच्या सव्वा भावाने प्राणवायू सिलिंडरची विक्री करत असल्याचे दिसून आले आहे. कोलकात्यामध्ये ऑक्सिजन सिलिंडरची नियमित किंमत सात हजार रुपये आहे. मात्र काही ठिकाणी हा सिलिंडर ३० हजार तर काही ठिकाणी ४० हजार रुपयांना विकला जात आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना नाईलाजास्तव महागड ऑक्सिजन सिलिंडर विकत घ्यावा लागत आहे.

# विजयी मिरवणुकांवर निवडणूक आयोगाची बंदी

**पीटीआय, नवी दिल्ली**

**देशातील करोनाच्या** दुसऱ्या लाटेला निवडणूक आयोगच (ईसी) जबाबदार असल्याचे निरीक्षण सोमवारी मद्रास उच्च न्यायालयाने नोंदविले आणि त्यावरून आयोगाला चांगलेच फटकारल्यानंतर आता आयोगाला उपरती झाली आहे. करोनाच्या प्रादुर्भावाला पायबंद घालण्यासाठी मंगळवारी निवडणूक आयोगाने ज्या राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका आहेत तेथे मतमोजणीनंतर सर्व प्रकारच्या विजयी मिरवणुकांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.

पश्चिम बंगाल, तमिळनाडू, आसाम, केरळ आणि पुदुचेरी येथे २ मे रोजी मतमोजणी होणार आहे. पश्चिम बंगालमध्ये आठव्या टप्प्यातील मतदान २९ एप्रिल रोजी होणार आहे, तर अन्य चार ठिकाणची मतदान प्रक्रिया पूर्ण झाली आहे. देशभरात करोनाचा प्रादुर्भाव वेगाने वाढत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर आयोगाने मतमोजणीसाठी अधिक कडक तरतुदी जाहीर केल्या आहेत. मतमोजणीनंतर २ मे रोजी विजयी मिरवणुका काढण्यावर आयोगाने बंदी घातली आहे. सर्व राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना तसे आदेश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे विजयी उमेदवारासमवेत किंवा त्यांच्या/तिच्या केवळ अधिकृत दोन प्रतिनिधींनाच निवडणूक अधिकाऱ्याकडून विजयी झाल्याचे प्रमाणपत्र स्वीकारण्यासाठी जाण्याची मुभा देण्यात आली आहे.

देशातील करोनाच्या दुसऱ्या लाटेला केवळ निवडणूक आयोगच जबाबदार असल्याचे निरीक्षण मद्रास उच्च न्यायालयाने सोमवारी नोंदविले आणि ही संस्था बेजबाबदार असल्याचे म्हटले होते.

## रशियाची लस मेअखेरीस भारतात

**वृत्तसंस्था, हैदराबाद**

**रशियाची स्पुटनिक** लस भारतात आयातीच्या मार्गाने मे महिन्याच्या अखेरीस उपलब्ध होईल, असे ही लस आयात व उत्पादन करण्याचा परवाना मिळालेल्या 'रेड्डी लॅबोरेटरीज' या हैदराबादच्या कंपनीने म्हटले आहे. रशियन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट फंड यांच्याकडून ही लस आयात केली जात आहे. सप्टेंबर २०२० मध्ये रेड्डीज व रशियन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट फंड यांच्यात स्पुटनिक व्ही लशीच्या चाचण्या करण्याबाबत करार झाला होता.

गमालेया नॅशनल रीसर्च इन्स्टिट्यूट ऑफ एपिडेमॉलॉजी अँड मायक्रोबायोलॉजी या संस्थेने ही लस तयार केली असून डॉ. रेड्डीज कंपनीने त्यांच्याकडून या लशीच्या १० कोटी मात्रा वितरित करण्याचा परवाना घेतला आहे. नंतर हे प्रमाण १२.५० कोटी करण्यात आले आहे. डॉ. रेड्डीजच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, पहिल्या तिमाहीतच या लशीची आयात केली जाणार असून मेअखेरपर्यंत या लशीचा पहिला साठा मिळण्याची शक्यता आहे. रशियन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट फंडचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरिल दिमित्रीव यांनी आभासी पत्रकार परिषदेत सांगितले की, स्पुटनिक लशीच्या ५ कोटी कुप्या भारतात या उन्हाळ्यात उत्पादित करण्यास तयार आहेत. ते म्हणाले की, उत्पादनासाठी पाच औषध कंपन्यांशी करार करण्यात येणार आहे.


**मिरा-भाईंदर महानगरपालिका**
**पाणीपुरवठा विभाग**
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, ४०१ १०१.

जा.क्र. मनपा/पापु/ ०३/२०२१-२२ दि. २७.०४.२०२१

**// जाहीर फेर-निविदा सूचना //**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध कामांसाठी ऑनलाइन फेर-निविदा मागविण्यात येत आहेत. फेर-निविदा सूचना व निविदा प्रपत्र http:/mahatenders.gov.in च्या संकेतस्थळावर दि. २९.०४.२०२१ ते दि. १०.०५.२०२१ रोजी १२.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत. http:/mahatenders.gov.in च्या संकेतस्थळावर दि. १०.०५.२०२१ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

जा.क्र.मनपा/जनसंपर्क/५१/२०२१-२२
दि. २७.०४.२०२१

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**पाणीपुरवठा विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**ठिकाण- भाईंदर**
**दिनांक- २७.०४.२०२१**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
कीटक नियंत्रण अधिकारी यांचे कार्यालय, पी/द. विभाग, चौथा मजला, एस. व्ही. रोड, गोरेगांव (प.), मुंबई- ४००१०४
दूरध्वनी क्रमांक (कार्यालय)- ०२२-२८७३७००० विस्ता. १८४)

**क्रमांक: किनिअ/५९/पी/द दिनांक: २४.०४.२०२१**

**सूचनापत्र**

कीटक नियंत्रण अधिकारी पी/द विभाग येथे पावसाळ्याच्या कालावधीत झोपडपट्टी आणि झोपडपट्टीसदृश ठिकाणी मलेरिया, डेंगी नियंत्रण विशेष कार्यक्रम राबविण्याकरिता ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी (माहे जून २०२१ ते नोव्हेंबर २०२१ पर्यंत) आवश्यक स्वयंसेवक उपलब्ध करून घेण्यासाठी नोंदणीकृत सहकारी/ बेरोजगार सेवा सहकारी संस्था यांच्याकडून अर्ज मागविण्याबाबत संकेतस्थळावर सूचनापत्र देण्यात येत आहे.

इच्छुक संस्थांनी याबाबतचा तपशील अर्ज व इच्छापत्राच्या नमुन्यासाठी **http://portal.mcgm.gov.in** या संकेतस्थळावर अथवा कीटक नियंत्रण पी/द विभाग (कार्यालयीन पत्ता: कीटक नियंत्रण अधिकारी यांचे कार्यालय पी/द विभाग, चौथा मजला, एस. व्ही. रोड, गोरेगांव (प.), मुंबई-४००१०४ येथे संपर्क साधावा.

संस्थेने कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कीटक नियंत्रण अधिकारी पी/द विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दिनांक ०७.०५.२०२१ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत.

सही/-
**साहाय्यक आयुक्त**
**पी/द विभाग**

पीआरओ/१६१/एडीव्ही/२०२१-२२
झाडे लावा, झाडे जगवा

**DELTA CORP LIMITED**
**Regd. Off :** 10, Kumar Place, 2408, General Thimayya Road, Pune 411 001.
• **CIN No.** L65493PN1990PLC058817 • **Tel No.** 91-22-4079 4700 • **Fax No.** 91-22-4079 4777,
• **Email ID:** secretarial@deltin.com • **Website:** www.deltacorp.in

**STATEMENT OF CONSOLIDATED AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31st MARCH, 2021**

(Figures are ₹ in Crores unless specified)

| Sr No. | Particulars | Quarter Ended 31/03/2021 Audited | Year Ended 31/03/2021 Audited | Quarter Ended 31/03/2020 Audited |
|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations | 211.34 | 418.87 | 180.93 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items #) | 72.39 | (9.62) | 43.30 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items #) | 76.10 | (18.58) | 43.30 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | 57.77 | (24.10) | 29.04 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 65.94 | 17.02 | (63.34) |
| 6 | Equity Share Capital | 26.68 | 26.68 | 27.09 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve)as shown in the Audited Balance Sheet of the previous year | - | 1,915.17 | - |
| 8 | Earnings Per Share (of ₹ 1/- each) (for continuing and discontinued operations) | | | |
| | Basic : | 2.16 | (0.90) | 1.07 |
| | Diluted : | 2.15 | (0.90) | 1.07 |

**The Financial details on standalone basis are as under :**

(Figures are ₹ in Crores unless specified)

| Sr No. | Particulars | Quarter Ended 31/03/2021 Audited | Year Ended 31/03/2021 Audited | Quarter Ended 31/03/2020 Audited |
|---|---|---|---|---|
| 1 | Income from Operations | 133.22 | 201.81 | 94.77 |
| 2 | Profit Before Tax | 64.29 | 96.58 | (24.55) |
| 3 | Profit After Tax | 48.01 | 86.75 | (33.04) |

**Note:**
a) The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the websites of BSE AND NSE at www.bseindia.com and www.nseindia.com respectively and on Company's website http://www.deltacorp.in/pdf/financial/2020-21/Cumulative-March-2020-21.pdf
b) # - Exceptional and / or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable.
c) The Board of Directors have recommended, subject to the approval of the equity shareholders at the ensuing Annual General Meeting, a dividend on equity shares of 100% i.e. ₹.1 per Equity Share.

**For Delta Corp Limited**
**(Jaydev Mody)**
**Chairman**
**DIN: 00234797**

**Place: Mumbai**
**Date: 26th April, 2021**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८**
**विद्युत विभाग**
**ई-निविदा सूचना क्र. क-विद्युत मुख्यालय/क/ह/०५-०२/२०२१-२०२२ (अल्प मुदत)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून खालील नमूद केलेल्या कामासाठी ई-टेंडरिंग पद्धतीने परसेंट रेट निविदा मागविण्यात येत आहे. प्रचलित दराने GST बिलात अदा केली जाईल. त्यामुळे GST वगळून दर द्यावेत.

| निविदा नोटीस क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रुपये | बयाणा रक्कम | अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | | निविदा फॉर्म फी 'जीएसटी'सह (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 05/01/ 2021-2022 | उपाययोजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदान येथे ४०० बेडचे नियोजित जम्बो कोविड-१९ रुग्णालयाकरिता उच्चदाब विद्युतपुरवठा करणे व अनुषंगिक कामे करणेबाबत. | रु. ३३९०४२६५ | रु. १६९५२१ | रु. १६९५२१३ | यंत्रणा पुरवठ्यासह उभारणी करून कार्यान्वित करणे. | २१ दिवस | रु. १५०७५/- |
| | | | | | यंत्रणेची चालन देखभाल दुरुस्ती | ०६ महिने | |
| 05/02/ 2021-2022 | आपत्ती व्यवस्थापन उपाययोजने अंतर्गत भोसरी येथील गावजत्रा मैदान येथे ४०० बेडचे नियोजित जम्बो कोविड-१९ रुग्णालयाकरिता उच्चदाब विद्युतपुरवठा करणे व अनुषंगिक कामे करणेबाबत. | रु. ३३९७५५७३ | रु. १६९८७८ | रु. १६९८७७९ | यंत्रणा पुरवठ्यासह उभारणी करून कार्यान्वित करणे. | २१ दिवस | रु. १५०७५/- |
| | | | | | यंत्रणेची चालन देखभाल दुरुस्ती | ०६ महिने | |

**निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | : | दिनांक २८/०४/२०२१ ते ०४/०५/२०२१ |
| ई-निविदा पूर्व सभा | : | निविदा नोटीस क्र. ०१ : दिनांक ३०/०४/२०२१, दु. ३.०० वाजता<br>निविदा नोटीस क्र. ०२ : दिनांक ३०/०४/२०२१, दु. ३.०० वाजता |
| निविदा स्वीकृती अंतिम दिनांक व वेळ | : | दिनांक ०४/०५/२०२१, दुपारी ३.०० वाजता. |
| निविदा उघडण्याचा दिनांक | : | दिनांक ०५/०५/२०२१, दुपारी ३.०० वाजता (शक्य झाल्यास) |

वरील कामासाठीचा तपशील, उदा. बयाणा रक्कम, अनामत रक्कम, निविदाच्या अटी, शर्ती, निविदा शेड्यूल्ड-बी इ. माहिती **https://mahaenders.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची निविदा पद्धत ई-टेंडरिंग पद्धतीने म.न.पा.च्या वेबसाईटवरून निविदा भरावयाची आहे.
सदरची ई-टेंडरिंग प्रक्रिये अंतर्गत निविदा वर नमूद केलेल्या दिनांक व नमूद केलेल्या वेळेपर्यंत ई-टेंडरिंग पद्धतीने वेबसाईटवरूनच भरता येतील. निविदाधारकांनी निविदेची फॉर्म फी बयाणा रक्कम म.न.पा. पेमेंट गेट वे सिस्टीमद्वारे भरावयाची आहे. कोणतेही कारण न देता निविदा पूर्णतः किंवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे. सदरची निविदा **https://mahaenders.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.
सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल support—eproc@nic.in अथवा Help Desk Number ०१२०-४२००४६२,०१२०-४००१००२,०१२०-४००१००५,०१२०-६२७७७८७ या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

जाहिरात क्र. ८४६
क्र. विमुका/०४/कावि/५५८/२०२१
दि. २७/०४/२०२१

सही /-
**( संजय खाबडे )**
सह. शहर अभियंता (वि/यां)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८